यशवंती — पुस्तक दुसरें

# इंदु - कला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७२२

कवि — यशवंत, चाफळ

किंमत ३ आणे

न्हवारी १९२३

REFBK-0002353

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत. ]

# प्रथम ... का.

REFBK-0002353
REFBK-0002353

१ देवा ... मुळे० ....
२ ऊठ ऊठ बाळे ! कोमळे ! ० ....
३ आल्यागेल्यांचा सारखा० .... ....
४ हिऱ्यामोतियांचे गळ्यामधिं० ....
५ झांकुनि घेउनिया आपला .... ....
६ पीतांबर कांसे, ललाटीं नाम० ....
७ पडे खळी श्वासें० .... ....
८ झुळझुळतो वारा० .... ....
९ स्वप्न तरी पडतें कशाचें .... ....
१० दचकुनि रात्रीची० .... ....
११ मांडीवर आई, मला तूं० .... ....
१२ सगळे खेळ तुझे० .... ....
१३ श्री – ग – णे – शा० .... ....
१४ दासबोध उघडा, ० .... ....
१५ आज लोंबकळसी० .... ....
१६ तिथी सुमंगल ही इंदु ! ० ....

दा. क्र. 2343

# रसिकांस

सकलांनाच कौतुकास्पद असणाऱ्या बाल-लीला, बालसरलता, बालप्रेम, बालांचे मुग्ध बोल, यांवरील या १६ कविता जरी एकाच 'इंदूला' उद्देशून असल्या तरी, प्रत्येकाच्या हृदयांत हेलावणाऱ्या भावनांच्याच या मूर्ति होत. कांहीं भावनांच्या किरणांचें वक्रीभवन मातृमुखांतून आहे, तर कांहींचें कवि-मुखांतून आहे; हें सूक्ष्म दृष्टीच्या वाचकाला समजेलच! रत्नाचें मोल रत्नपारख्याच्या स्तुति-निंदेवर अवलंबून असतें. चंद्राची कांती सूर्यकिरणांपासून — अतएव परभृत असते. महाराष्ट्र — रसिकांच्या सहानुभूतीनेंच या 'इंदु — कला, इंदुकलेच्या तोलाला चढणार आहेत. तथापि रसिकांच्या सहानुभूतीपेक्षां निःपक्षपातीपणाचीच कवीला अपेक्षा आहे.

अंबिकाभुवन, चाफळ<br>
ता. २०-१२-१९२२

सर्वांचा नम्र<br>
यशवंत

दा. क्र. 23५3

# इंदु-कला

[ शार्दूलविक्रीडित ]

देवांनीं कसल्या तरी चुकिमुळें गंधर्व जो शापिला
कांहीं काळ अम्हांप्रती भुलवुनी तो चालता जाहला.
माझा प्राणसखाच तो, जरि अतां नांदे न पृथ्वीवरी
तच्चैतन्य दिसे तनूत तुझिया सामावलेलें परी.

पाहोनी तुझिया मुखीं स्मित, गमे माझा सखा हांसला
ऐकोनी तव बोलणें, मज गमे माझा सखा बोलला.
तूं जातां पुढुनी, पदोपदिं गमे माझा सखा चालतो.
मित्राची प्रतिमाच देहिं तव मी आरोपुनी पाहतों.

देहीं दोन अम्ही, परी निगडलीं एकत्र होतीं मनें.
त्यातें आठवुनी मनांत रडणें, दुःखी जिणें कंठणें.
दैवातें नच निंदुनी, बघुं तुझी मूर्ती परी गोजिरी,
मानूं 'मित्र दिगंतिं तद्युति परी संचारते भूवरी'.

माझ्या प्राणसख्यामुळें प्रिय मला प्राणाहुनी तूं, पण–
तूझ्या बालपणामुळेंहि तुझिया ठायीं जडे मन्मन.

[ २ ]

[ चाल-मन द्विधा होतें० ( मनोविजय ) ]

ऊठ ऊठ बाळे! कोमले! छकुले, लडिवाळे!
करि अपुले चाळे, पायिंचे वाजूं दे वाळे.
गजबजलें अपुलें फुलांनीं उपवन भृंगांनीं,
सदन जाउं दे हे भरोनी मंजुळ तव गानीं,
दव-बिंदू पडती, चमकती हरित तृणावरती,
पुष्पदलांवरती, जणूं ते शिंपल्यांत मोती.
अंगणांत माझ्या घागऱ्या चरणींच्या तुझिया
ओघळुनी साऱ्या नर्तनीं सहजीं पसराव्या.
सडा फुलांचा तो, तसें हें अंगण शोभेल,
चांदण्यांत असल्या यावया चंद्रहि लोभेल.
लपवी मुख बघुनी भानुला, तया चुकाराचा
तोरा परि घ्यावा पाहुनी केवळ रात्रीचा!

बालकिरण रविचे घ्यावया मुके जिचे सजले,
तीच इंदु माझी लाडकी! ऊठ ऊठ छकुले!

६३८



आल्या गेल्यांचा सारखा भरतो बाजार,
परि माझ्या जीवा तुजविना दुजा न आधार.
पिंजऱ्यांत गाते सारिका, नाचतसे मोर,
मन्मति रति नच घे जरी ना तूं तिथें समोर.
मनास रमवाया करावा उपवनिं संचार,
सत्य सत्य परि हें ' तुजमुळें फुलें मला प्यार. '
फूलपाखरांची चालली संतत धांवपळ,
ज्यांत त्यांत दिसते परंतू ही अचपळ बाळ.
वसुंधरा सारी स्वरूपीं तुझ्याच जणुं नटली,
चंद्र, सूर्य, तारे – तुजाविना दीप्ति तयां कुठली ?
सुखांत कसल्याही जरी नच तव भागीदारी,
उदासीनतेची साउली त्यावरि येइ तरी.

जाउं नको बाळे ! माझिया तूं डोळ्यांपुढुनी,
एकाकी मी ही पाहते तुझ्यांत लोक तिन्ही.

[४]

हिऱ्यामोतियांचे गळ्यामधिं घोस लोंबतात,
तिलक कुंकुमाचा कपाळीं, गालावर तीट.
गळां घालुनीया रेशमी सुमनांच्या माळा,
सुमनासम मृदुला गोरटी ये राजस बाळा.
विकसोन्मुख कलिकांमाधेल कीं उभाच मकरंद,
कीं बोलामधला प्रीतिच्या नाजुक आनंद,
चराचरांमधलें प्रीतिचें कीं गायन मंद,
कीं संमेलन हें तिघांचें – प्रेम, गीत, गंध !
विविध लोलकांची बाहुली नटवुनि रंगविली,
उमलवीत जगता उषा कीं उदयाचलिं आली.
देउं किती उपमा ? पुढें जर बालरूप विभुचें,
' नेति नेति ' येती ध्वनी हे नकळत मम वाचे.

उणीव एकच ही, अतां तूं बोलूं लाग गडे !
समाधि मग जडतां, शिरीं मम कोसळुं देत कडे !

झांकुनि घेउनिया आपुला नवीन शृंगार,
डोकावुनि बघते बालिका कुणि वारंवार.
कोण कोण तिकडे? बघू तें! कोण तरी लपलें?
दिसले रे दिसले, अह्मांला रामदास दिसले!
डोलत तोंच पुढें ठाकली मूर्त डौलदार,
बोलत शांतपणें ' जयजय समर्थ रघुवीर! '
करीं कुबडी स्मरणी, मेखळा भगवी अंगांत,
' सदा सर्वदा ' हा मनाचा श्लोक चुकत गात.
बालपणीं कां हा बाणला रामदासि बाणा?
एव्हांपासुनि कां कुलाच्या धरितां अभिमाना!
महाराष्ट्र मृत हा चेतना तया नवी द्याया
खरंच गडे! बाणा पाहिजे आज असा घ्याया!

' रामदास ' ह्मणु कां ' घेउनि आले अवतार! '
स्वतंत्रता–देवी जाहली अथवा साकार?

[ ६ ]

पीतांबर कासे, ललाटीं नाम कस्तुरीचा,
कलींत अवतरला मुरारी कीं द्वापारींचा !
बालमुकुंदा ! हा कशाला घेतलात शीण ?
पावन करितां कां अह्मांतें ?– अह्मी हीन दीन !
दीन अनाथांच्या धांवण्या धावुनिया येतां,
ब्रीदावलि फिरुनी आपुली पटवुनि कीं देतां ?
कां न दिसे हातीं ? कुठें ती मनमोहन मुरली !
वृंदावनवृत्ती जियेच्या नादानें हरली.
मुरलीची जादू बोबड्या बोलामधिं मुरली ;
बोल बोबडे ते – चालुं दे तर मग ती मुरली
तुझिया बोलानें – नव्हे, त्या मुरली नादानें
हृदयींचीं शल्यें घडिभरी कां नच बोथटणें ?

कंठ दाटला तों, आसवें माउलिचीं गळलीं.
बालमुकुंदानें धांवुनि ओंजळींत धरलीं.

# बालमुकुंद.



"पीतांबर कांसे, ललाटीं नाम कस्तुरीचा,
कलींत अवतरला मुरारी कीं द्वापारींचा-"

'यशवंत.'

ोरंजन प्रेस, मुंबई.

[ ७ ]

पडे खळी श्वासें असे तव करतल दुलदुलित,
धरू नको ह्मणुनी आसवें अपुल्या ओंजळिंत.
तीं माझीं माझ्या शिरावरि देई शिंपुनिया,
शिकवी मज दुःखें मनींचीं मनांत दडपाया.
ज्वालामुखि माझ्या सारखा हृदयीं जळजळतो,
हा नयनांवाटे रसाचा तप्त लोट येतो.
हें माझें लेणें असू दे मलाच लखलाभ,
विटाळ तुज नलगे, नको तुज दुःखांचा दाब!
दुःखित हृदयींची रसरसे ही ओली आग
बालभावनांची तियेनें जळेल नव बाग.
कसें हें न कळलें मला तरि! अश्रू ओघळले,—
न तेहि एकांतीं; हांसऱ्या नयनां दाखविले!

बघ डोळे पुसले; न होवो खुरटा हा वाफा!
मम दुःखाश्रूंच्या तया कधिं लागो नच वाफा!

[ ८ ]

झुळझुळतो वारा जनांचा ताप निवाराया
लुकलुकते तारा मनामधिं आशा उभवाया
उतरे भूवरती चंद्रिका जगास जगवाया
चंद्रकला माझी सांगते अंगाई गाया.
'नीज नीज बाळे!' –लागली क्षणामधीं झोंप.
नित्य लोचनीं ती जिवाला ज्या नच भवताप.
हंसत मुखावरती सारखी टक लावुनि बसले,
कां एकाएकी खिन्नतापटल तिथें दिसलें ?
ओळख नसतांना जिवाला कठोर जगताची,
स्मृति गतदुःखांची, न चिंता भावी काळाची,
अथवा बसले ना जिव्हारीं शद्बांचे भाले,
षड्रिपुचे हल्ले नसोनी, मन कष्टी झाले.

झोंप नको असली; लाडके! ऊठ गडे ऊठ!
कालवतें पोटीं; गळ्याला मार मिठी घट्ट!

[९]

स्वप्न तरी पडतें कशाचें हें सोनुकलीला!
कोण तिथें दावी आपुल्या भेसुर बहु लीला!
ऊर धडधडे कां? कशाचें दुःख तुला इंदु!
कां रडवी मुद्रा? लोचनीं अश्रूंचे बिंदू!
कार्यी जयहानी, निराशा, मानभंग अथवा,
मरणाची भीती, न ठावे भग्नमनोरथ वा.
स्वर्गाचि भूवरती माझिया अंकावरि तुजला,
कांजळकांठ असा वृथा कां अश्रूंनीं भिजला!
हास्यानें तुझिया येतसे उमेद मजलागीं,
निर्जन मैदानीं उपवनें दिसतिं जागजागीं,
कंटकही दिसती पथांतिल दारुण अंधारीं.
भरदिवसा तुझिया रोदनें पारे ये अंधारी

ऊठ गडे छकुले! पुरे ही दुःखद तव निद्रा,
हुरहुर निववाया ऊठ, ये, मार मिठी चंद्रा!

[१०]

दचकुनि रात्रीची मारिसी हांकावर हांका,
इहलोकीं नसतां कुणी तुज ' ओ ' देतिल पारि कां ?
झोपेंतुनि उठुनी घालिसी मानेला विळखा
दृष्टीला दृष्टी रोखुनी सबाष्प बघसी कां ?
पुसते परि तुज मी कशाला वृथाच वरकरणी,
ही दाटी केली अश्रुंनीं माझियाहि नयनीं.
तुझें चिमुकलें ज्या कारणें धडधडतें ऊर,
तीच हृदीं माझ्या कालवाकालव हुरहूर.
स्वप्नामधिं तुजला दिसूनी आली जी मूर्ती,
तीच पोहताहे माझिया अश्रुजलावरती.
बोलुनि दावाया परंतू येईना तुजला,
सकल मला कळतें, तेंच तर असह्य बहु मजला.

एकामेकांनीं द्यायचा धीर उभयतांना,
मग कां हें रडणें ? पुसूं या, ऊठ लोचनांना !

[stamp] क्र. ०७४ ५-३-८



" मांडीवर आई ! मला तूं आज घेतलेस "
वरचेवर ह्मणसी ; कितीतरी तुज त्याचा हर्ष!
हें ज्यांना त्यांना सांगसी तूं उठल्यासुटल्या,
किति आनंदाच्या अंतरीं तव उकळ्या फुटल्या !
कळे न अर्थ कुणा तुझ्या या अत्यानंदाचा,
मातेच्या कविच्या अंतरीं ग्रंथ परी त्याचा.
नको सुमनशय्या, नको जरतारी श्रृंगार,
कुबेर – सदनींचे नको मणि – मोत्यांचे हार.
आईच्या अंकीं निरंतर लोळण लाभावें,
वत्सल नजरेची पांघरुनि झूल झोंपि जावें.
नको अन्नपाणी, भुकेला मुकेहि पुरतात,
लालन पालन हें मिळाल्या, स्वर्गावर लाथ !

या एक्या वचनीं इंदु ! तूं गुरूच मज होसी,
बालगुरो ! शिकवा कधींकधिं असेंच चुकल्यासी,

[ १२ ]

सगळे खेळ तुझे चालती सदाच निर्बंध
प्रतिक्षणीं देती नवनवा सकौतुकानंद.
कितीकदां चुकसी, परि मनीं नच खंती चुकतां,
बाल्यीं साधूची वृत्ति ' सुखदुःख समेकृत्वा. '
पांच सात किंवा झेलिसी नउ सागरगोटे,
सागरगोटे त्या ह्मणावें तरि ठरतें खोटें.
होती वर खालीं झेलतां, नयनांची कांती—
पडतां त्यांवरती मिळे त्या रत्नांची दीप्ती.
ते कविरायाचे झेलिसी कीं पंचप्राण,
सप्तसागरांना मिळे कीं गोल रूप सान,
कधीं कधीं होती नवग्रह तुझें खेळणें कीं,
तव हातीं याया वांछिती देव पहा नाकीं.

ह्मणुनी इंदु गडे! सारखी अशीच तूं खेळ;
भग्न चित्त रमतें, जया नच संसारीं मेळ.

[१२]

" श्री-ग-णे-शा " तें वंदुनी मुळाक्षरें पुढचीं-
गिरवाया सजसी; कुचेष्टा होती परि त्याची.
ह्मणे कुणी " वेड्या वांकड्या काय अहा रेघा! "
जलवृष्टी बिजली मातृपद देती परि मेघा.
बालमुकुंदाच्या आननीं दिसलें ब्रह्मांड,
उद्यां कशावरुनी लिपी ही करील नच बंड?
कणाकणामधुनी सांपडे मृत्तिकेंत सोनें,
प्रगट न व्हावी कां लिपींतुनि या ब्रह्मज्ञानें!
मुळाक्षरें जरि हीं आजला इतस्ततः दिसलीं,
भावीं सौख्याचीं साधनें त्यांत परी लपलीं.
आज भासतीं जीं अक्षरें जनांस बेडौल
मोक्षाच्या वाटा उद्यां परि तींच दावितील.

तमास संहरिते वांकडी चंद्राची कोर,
अथांग भवडोहीं लिपी ही नाव बांकदार.

REFBK-0002353
REFBK-0002353

दासबोध उघडा, क्रमानें नजर फिरे वरुनी
अर्थबोध कुठला, चित्त जर भलत्या अवधानीं.
दुःखी स्मरणांची सांखळी कां अवचित तुटली ?
परिचित हास्याची लकेर श्रवणिं आपटली.
वळुनि पाहिलें तों हांसली इंदू खेळांत,
चित्त माउलीचें उडालें क्षणिं गतकाळांत.
हांस पुन्हां इंदू ! सारखी अशीच तूं हांस !
मृतसौख्याशेचा सेवुं दे पुनरपि मज भास.
ज्या हास्यावरती मनोरे अगणित मी रचले
तेंच निमाल्यानें अकालीं सगळे कोसळले ।
देव्हाऱ्यामधल्या मूर्तिचें तूंच बालरूप !
खळी तुझ्या गालीं देतसे औदास्यीं हुरुप.

लकब तिकडची ती हुबेहुब मिळे तुला ; हांस !
सत्य सुखाभावीं दुःखिता आवडतो भास !

[stamp]

*तिथी सुमंगल ही, इंदु ! तव †सालगिरा आज ;
शतायुषी भव ! घे हा तुला कवितांचा साज.
ओवाळणि कसली याविना दुसरी तुज घालूं ?
गरिबाच्या सदनीं न मुक्ताहार, न वा शालू.
रत्नाकर लाजे पाहुनी कवितापंक्तीला,
'शतायुषी भव' या प्रीतिच्या आशिर्वचनाला.
शोभति शंभर या पाकळ्या जीवितारविंदा,
अथवा प्रतिवर्षीं उघडतो एक एक पडदा.
जीवित — काळानें सोडिला बाणच हा जाण,
उल्लंघुनि वेगें चालला तव बाल्योद्यान.
त्रिभुवनमोलें ही न लाधे फिरुनी बाळपण ;
काळनक्र मोठा न सोडी मणि दाढेंतून.

मधुर बाल्यसौख्यें पुढें कधिं तुजला आठवतां
जरि गाशिल कवनें हीं, तरी मत्श्रमसार्थकता

समाप्त

* फाल्गुन शु॥० १३ † वाढदिवस.

[१५]

आज लोंबकळसी घालुनी मानेला विळखा,
कोण कवी कुठला ? थोरपणिं ढुंकुनि बघशिल कां ?
भीत भीत ऐसा प्रश्न करि मन शंकेखोर
अनुभव वृक्षाची चाखतां कडू फळें जहर.
घडो विचारें हें, खरोखर असेल घडणार ;
नियतीला कैशी कुणाची शक्ति अडविणार !
सौख्य मानुनीया भोगणें दुःखांचा भार,
हाच मुळीं आहे जीवितीं दुष्ट रोजगार.
जीं आशिर्वचनें ऐकिसी आज मुखांतील,
त्वां अवमानियलें तरीही तींच प्रगटतील.
वेड लावुनी जें घालतें हृदयांगणिं नाच
तुझिया थोरपणीं आठविन बालरूप हेंच !

होइल काय उद्यां ! कशाला वृथा धरूं भीती ?
गतसौख्यस्मरणें देइ कवि दुर्दैवा माती !